| ११ | ५११ | डॉ. दिलिप पी. जांभुळे | प.वि.अ. | ५००००० | २६/०७/२०१६ | १५३५३७ | ३४६४६३ | ३७५३ | संशियत वर्गी. ३ | १७३२३२ |
| १२ | ५१२ | मोहम्मद वासीकर रहेमान | लघु लेखक | ३५०००० | ०७/१०/२०१४ | ९४०६९ | २५५९३१ | ४४३६६ | संशियत वर्गी. ३ | १२७९६६ |
| १३ | ८७७ | श्रीमती दुर्गाबाई बबन यादव | परिचर | ६०००० | १६/०६/२००४ | ४६७४ | ५५३२६ | ५०९०७ | संशियत वर्गी. ३ | २७६६३ |
| १४ | १९१ | श्री. विलास प्रल्हाद लोणारे | व.लि. | ७००००० | ०२/०२/२०१९ | २४३८९० | ४५६११० | ४८८१ | अनियमित | २२८०६ |
| १५ | ३०७ | श्री. अनिल शामलाल कुरील | परिचर | ७००००० | ०१/०३/२०२१ | ७१५५१ | ६२८४४९ | ५७७३ | अनियमित | ३१४२२ |
| १६ | ३१८ | श्री. संजय ह. उईके | परिचर | ७००००० | २२/०१/२०२२ | ५८०० | ६९४२०० | ६००० | अनियमित | ३४७१० |
| १७ | ४४० | श्री. अनिल भिवाजी परतेती | परिचर | ४००००० | २६/१०/२०२० | १४३७७५ | २५६२२५ | ५५५२ | अनियमित | १२८११ |
| १८ | ५१८ | श्री. मुकूंद म. सोनवने | परिचर | ७५०००० | २७/०५/२०१९ | ५२९६४१ | २२०३५९ | १४१३९ | अनियमित | ११०१८ |
| १९ | ६५० | डॉ. चित्रा नाना राऊत | प.वि.अ. | ५००००० | ०२/०६/२०१६ | ४३२१५९ | ६७८४१ | १०५७३ | अनियमित | ३३९२ |
| २० | ६६५ | श्री. अनिल टि. राणे | स्वच्छक | ४५०००० | २६/०२/२०२१ | २१०६३९ | २३९३३६१ | ३४२६० | अनियमित | ११९६८ |
| २१ | ८४६ | उसेंडी डॉ. एकनाथ शंकर | प.वि.अ. | ५००००० | ०२/०२/२०१७ | २७०७३२ | २२९२६८ | १८६३२ | अनियमित | ११४६३ |
| २२ | ८५३ | श्री. सुमेध भिमराव नाखले | क.लि. | ८००००० | २९/०३/२०२२ | १६६ | ७९९८३४ | ५७७६७ | अनियमित | ३९९९२ |

| अध्यक्ष | उपाध्यक्षा | कोषाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|---|
| **श्री. शशांक शं. चोबिटकर** | **श्रीमती ज्योती अ. घोडेस्वार** | **श्री. विजय अ. गजबे** | **श्री. प्रकाश रा. सहारे** |

पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, परिसर, महाराजबाग समोर, नागपूर - १२
नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२

## लेखा परीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ आणि त्यावरील नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित, नागपूर नोंदणी क्र.एन,जी.पी./बी.एन.के.२०१ दि.३१/०७/१९७२ या संस्थेला सोबत जोडलेला ३१ मार्च २०२३ या दिनांकाचे ताळेबंद व सन २०२२–२३ या आर्थिक वर्षाचे नफा–तोटा पत्रके तपासले असून अहवाल करतो कि,

१. संस्थेच्या आर्थिक पत्रकाचि जबाबदारी संस्थेच्या संचालक मंडळाची असून माझी जबाबदारी या आर्थिक पत्रकाबाबत लेखापरीक्षणाचे आधारे मत करणे हि आहे.

२. माझे लेखा परीक्षण भारतामध्ये सर्व सामान्यपणे मान्यता प्राप्त असलेल्या लेखापरीक्षण मानकांना अनुसरून केले आहे. ज्यानुसार सदरच्या आर्थिक पत्रकामध्ये गंभीर दोष नाहीत. याची खात्री करण्यासाठी आवश्यक असलेले लेखा परीक्षणाचे नियोजन व कार्यवाही केली जाते.

३. संस्थेच्या आर्थिक पत्रकातील रक्कमा व प्रकटन याची चाचणी परीक्षा हिशोबी तत्वे व महत्वाचे अंदाज यांचे परीक्षण व वार्षिक आर्थिक पत्रकाचे सादरीकरण याचे मूल्यमापन, या सर्वाचा लेखा परीक्षनामध्ये समावेश होतो.

४. माझा विश्वास आहे कि, लेखापरीक्षा माझे मत व्यक्त करण्यासाठी योग्य आधार पुरविते.

५. मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ वरील नियम १९६१ चे अधिनियम अन्वये लेखापरीक्षणातील भाग अ, ब, व, क, मधील सामान्य शेरे व सूचना यास पात्र राहून अहवाल सादर करतो कि,

अ) माझे मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियम आणि संस्थेचे पोटनियमास अनुसरून आवश्यक असणारे हिशोब पुस्तके योग्य रीतीने ठेवलेली आहे.

ब) माझ्या लेखापरीक्षणाच्या उद्धेशासाठी माझा ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुरी ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झालेले आहे.

क) माझे लेखापरीक्षनात संस्थेचे व्यवहार हे संस्थेच्या अखत्यारीतील आहे.

ड) माझे मते संस्थेने तयार केलेले ताळेबंद व नफा–तोटा पत्रक हिशोबी पुस्तकाशी जुळते.

६. वरील उल्लेख केलेल्या अहवालातील भाग अ, ब, व, क, यामधील शेरे चव सूचना विशेषता यास पात्र राहून

अ) संस्थेचे दिनांक ३१.०३.२०२३ रोजीचे ताळेबंद पत्रक संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तविक स्थिती दर्शविते.

ब) दिनांक ३१.०३.२०२३ अखेरचे नफा–तोटा पत्रक त्या दिनांकस संपणाऱ्या वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तविक स्थिती दर्शविते.

७. सन २०२२–२३ या वर्षासाठी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग ''अ'' कायम करण्यात आला आहे.

(श्री. विनोद उ. दिवे)
प्रमाणित लेखा परीक्षक
सहकारी संस्था, नागपूर
पॅनल क्र. १३१३६

स्थळ : नागपूर
दिनांक : ३०/०७/२०२३

## नमुना एन-२

### कलम ८१ आणि नियम ६९ (३) पाहा

### सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या अहवालाचे निदर्शनात्मक स्वरुप

प्रति,

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक

पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित, नागपूर

रजि. नं. २०१/७२

विषय :नेमणूक पत्र वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १८/०९/२०२२ ठराव क्र.९ नुसार प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१. पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, नागपूर रजि. नं. २०१/७२ यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०२३ पर्यतचे असुन वर्षाच्या अखेरीपर्यतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधुन मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३. केलेल्या लेखापरीक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही लेलेल्या लेखापरीक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंटन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरीक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरीक्षण योग्य आश्वासनापूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासुन मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४. लेखापरीक्षेमध्ये लेखापरीक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व ते लेखापरीक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक

विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरीक्षमध्ये जमाखर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्रकाचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५. लेखापरीक्षेचा पुरावा जो आम्ही मिक्वविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

अभिप्राय

६. आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टिकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे.

एक — ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२३

दोन — नफा आणि तोटा विवरणपत्रकाच्या बाबतीत/जमा आणि खर्च त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि,

इतर कायदेशीर आणि नियमक बाबींवरील अहवाल.

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

आम्ही अहवाल देतो की,

८. (अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरीक्षणासादी जरुरी आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

(ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यांत आले आहेत,

(क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखाकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहे.

९. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०. आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो.

(एक) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोआ आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचया योग्य मेळ बसत आहे.

(दोन) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

(तीन) आम्ही लेखापरीक्षा केलेल्या शाखांचे ताब्लेबंदपत्रक शाखा लेखापरीक्षकांनी केले असून तो आम्हाला जरुरीचा आहे त्याप्रमाणे दिलेला आहे.

(चार) लेखापरीक्षा चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला – अ वर्ग मिळाला आहे.

हुद्दा
सदस्यत्वाचा क्रमांक
फर्मचा नोंदणी क्रमांक
लेखापरीक्षण तालिका क्रमांक : १३१३६
सही करण्याचे ठिकाण : नागपूर
अहवालाची तारीख : ३०/०७/२०२३

(श्री. विनोद उ. दिवे)
प्रमाणित लेखा परीक्षक
सहकारी संस्था, नागपूर
पॅनल क्र. १३१३६

पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, परिसर, महाराजबाग समोर, नागपूर - १२
नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२

# ५१ वी वार्षिक आमसभेचे इतिवृत्त

**सभा वृत्तांत**

आज दिनांक १८/०९/२०२२ रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता पतसंस्थेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. दिलीपसिंह रा. चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली तसेच यांच्या प्रमुख उपस्थितीत अमृतभवन नॉर्थ, अंबाझरी रोड, नागपूर येथे मा. डॉ.बी.आर. रामटेके, पदसिद्ध अध्यक्ष तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री. दिलीपसिंह रा. चव्हाण, अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय व ठराव संमत करण्यासाठी आयोजित करण्यात आली. या सभेला एकूण २६१ सभासद उपस्थित होते.

प्रथम सर्व सन्माननीय सभासदांचे सभेला उपस्थित झाल्याबाबत स्वागत करण्यांत आले. सभेची सुरुवात करतांना उपस्थित प्रमुख अतिथी यांचे स्वागत करुन सभा अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांना स्थान ग्रहण करण्यांस विनंती केली व प्रमुख अतिथी यांचे हस्ते दिप प्रज्वलित करण्यांत आले. तसेच उपस्थित असलेल्या मुख्य अतिथीचे, संस्थेचे अध्यक्षांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यांत आले. सभेचा कोरम पूर्ण झाल्यामुळे सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र. १ : अहवाल वर्षात संस्थेचे दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.**

**ठराव क्र. १** : अहवाल वर्षात जे लष्करी जवान देशभक्त, थोर नेते, लेखक, कवी, साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, खेळाडू सामाजिक व सहकारी कार्यकर्ते खात्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच आपल्या संस्थेचे सभासद, हितचिंतक दिवंगत झाले त्या सर्वांना नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली

| | |
|---|---|
| स्व. श्री. रामराव शा. बावनकर | परिचर |
| स्व. श्री. राजेश मा. ब्राम्हणकर | सा. आ. प. सं. |
| स्व. श्याम तु. मेश्राम | परिचर |
| स्व. श्री. राजेंद्र मो. वैद्य | पशुधन पर्यवेक्षक |
| स्व. डॉ. विजय खुळे | सा. आ. प. सं. |

विषय क्र. २ : सभासदांचे ४ थी व ७ वी करिता पहिल्या दोन तसेच १० वी व १२ वी करिता पहिल्या पाच परीक्षा उत्तीर्ण मुला–मुलींचे गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना मानचिन्ह व भेटवस्तु देऊन सत्कार करणे.

ठराव क्र. २ : संस्थेतील सभासदांचे मुलं–मुली गुणवत्ता प्राप्त झालेले आहे. त्यांचा सभेत उपस्थित प्रमुख अतिथी तसेच संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळाच्या हस्ते खालील प्रमाणे स्मृतिचिन्ह, भेट वस्तु व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

## वर्ग १२ वी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | बोर्डाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु. मैथिली राजेंद्र रेवतकर | ६०० | ५८३ | ९७.१७ | पुणे |
| २ | कु. जयश निरंजन शेटे | ६०० | ५४० | ९०.०० | पुणे |

## वर्ग १० वी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | बोर्डाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु. ऋतुजा उमेश हिरूडकर | ५०० | ४८० | ९६ | सी.बी.एस.सी. |
| २ | कु. सेजल प. रामटेके | ६०० | ४१७ | ६९.५० | सी.बी.एस.सी. |
| ३ | कु. मोहन घोरमाडे (धांडे) | ६०० | ५८९ | ९८ | सी.बी.एस.सी. |
| ४ | कु. श्रीरंग विजय तलमले | ५०० | ४६३ | ९३ | सी.बी.एस.सी. |
| ५ | कु. क्रिश राजेश वरेटकर | ५०० | ४२१ | ८४.२० | पुणे |

वरील सर्व पाल्यांना त्यांचे पुढील शिक्षणासाठी चांगल्या श्रेणीत पास होण्याकरिता व अभ्यासाकरिता संस्थेच्या सर्व सभासदांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र. ३ : सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार करणे..

ठराव क्र. ३ : संस्थेतील सभासद जे अहवाल वर्षात शासनाचे सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचा सभेत उपस्थित प्रमुख अतिथी तसेच संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळाच्या हस्ते मानाचा फेटा बांधुन त्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यांत आला.

## पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, परिसर, महाराजबाग समोर, नागपूर - १२

नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२

| अ.क्र. | सभासदांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. चंद्रशेखर कृ. गांजरे | परीचर |
| २ | डॉ. अरुण प्र. हांडा | पशुधन विकास अधिकारी |
| ३ | श्री. शेषराव महादेव सोनेकर | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ४ | डॉ. सुनिल प्रल्हाद कळमकर | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ५ | श्री. विलास पुंडलीकराव लोणकर | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ६ | श्री. रुषी डोमाजी बगमरे | परीचर |
| ७ | श्री. काशीनाथ ना. मासुरकर | परीचर |
| ८ | श्री. श्रीकृष्ण शं. पुरी | पशुधन पर्यवेक्षक |
| ९ | श्री. सुनिल श्री. डोळस | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| १० | श्री. संजय गोविंदराव नारळे | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ११ | श्री. पारस कि. बिसांद्रे | पशुधन पर्यवेक्षक |
| १२ | श्री. कमलाकर जमनलाल पाठक | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| १३ | श्री. सुधाकर मु. मोहूर्ले | पशुधन पर्यवेक्षक |
| १४ | श्री. हेमराज कि. धनविज | पशुधन पर्यवेक्षक |
| १५ | डॉ. गणपती मा. सातपुते | सहायक आ पस |
| १६ | श्री. शेषराव सो. ढोरे | परीचर |
| १७ | श्री. श्रीकृष्ण एल. सोमनाथे | परीचर |
| १८ | श्री. रामजी के. हिचामी | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| १९ | श्री. अरुण श्रावण पेशने | प्रयोगशाळा सहाय्यक |
| २० | श्री. पुरूषोत्तम उ. चव्हाण | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २१ | श्री. दिगांबर सि. दुर्गे | वाहन चालक |
| २२ | श्री. कलेशनंदन रा. पानबुडे | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २३ | डॉ. संजय बापूराव अंदूरकर | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन |
| २४ | श्री. हंसराज एम. मून | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २५ | श्री. गजाननराव एस. नन्नावरे | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २६ | श्री. प्रकाश एम. बावनकर | अधिक्षक |

| अ.क्र. | सेवानिवृत्त सभासदांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| २७ | श्री. सुनील म. इलमुलवार | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २८ | श्री. यशवंत बलराम गेडाम | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| २९ | श्री. रमेश मारोतराव शिंदे | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ३० | श्री. संजय बबनराव भांडवलकर | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ३१ | श्रीमती निलिमा अ. काकडे | परीचर |
| ३२ | श्री. जगदीश पी. पाटील | शिपाई |
| ३३ | श्री. प्रमोद पी. डोंगरे | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ३४ | डॉ. कमलेश संपत लोखंडे | पशुधन विकास अधिकारी |
| ३५ | श्री. नथ्थूजी भगवानजी मेंढे | परीचर |
| ३६ | डॉ. अरविंद सोमनाथ शंभरकर | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन |
| ३७ | श्री. श्रीराम मो. बान्ते | परीचर |
| ३८ | डॉ. शेषराव ल. डांगोरे | पशुधन विकास अधिकारी |
| ३९ | श्री. दिलीप एस. वारजूरकर | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी |
| ४० | श्री. दिलीप फुलचंद पटीये | वाहन चालक |

**विषय क्र. ४ : दिनांक १८/०९/२०२२ रोजी झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.**

**ठराव क्र. ४ :** दिनांक १८/०९/२०२२ रोजी झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्त श्री. प्रकाश रा. सहारे, सचिव यांनी सविस्तर वाचुन दाखविले व वृत्तांत बरोबर लिहिला असल्यामुळे मागील सभेचा वृत्तांत कायम करण्यात येत आहे, असे ठरले.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ५ : सन २०२१—२२ वर्षातील संस्थेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाच्या वतीने सादर केलेल्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे.**

**ठराव क्र. ५ :** ३१.०३.२०२२ रोजीचे ताळेबंद यांचे वाचन श्री. प्रकाश रा. सहारे, सचिव यांनी सभेसमोर वाचन केले. त्यातील सविस्तर बाबी खालील

**जमा—खर्च विवरण पत्र दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत**

| | | |
|---|---|---|
| सुरुवातीची शिल्लक | रु. | २१,१९,१८१/— |
| वार्षिक जमा | रु. | १०,०६,६४,०५६/— |
| वार्षिक खर्च | रु. | १०,१७,९८,१७८/— |
| अखेरची शिल्लक | रु. | ९,८५,०५९/— |

**नफा तोटा पत्रक दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत**

| | | |
|---|---|---|
| वार्षिक उत्पन्न | रु. | ६९,४२,१९६/— |
| वार्षिक खर्च | रु. | १९,११,५२५/— |
| वार्षिक नफा | रु. | ५०,३०,६७१/— |

**ताळेबंद दिनांक ३१/०३/२०२२ अखेरचे**

| | | |
|---|---|---|
| देयता रक्कम | रु. | ७,७६,१३,३१४/— |
| संपत्ती रक्कम | रु. | ७,७६,१३,३१४/— |

वरील सर्व हिशोबाचे वाचन करण्यात आले व त्यावर चर्चा करण्यांत आली असता संस्थेची आर्थिक स्थिती व नफा—तोटा यावर सभासदांनी काही प्रश्न विचारण्याकरीता ५ मिनिटांचा वेळ देण्यांत आला व सन २०२१—२२ च्या हिशोबास एकमताने मंजुरी प्रदान करण्यांत आली.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ६ : संचालक मंडळाने सदर केलेले वैधानिक लेखापरीक्षण श्री.व्ही.के. गुंजकर यांनी तपासलेले दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरचे ताळेबंद व नफा—तोटा पत्रकावर वाचन करणे व स्विकृत करणे.**

**ठराव क्र. ६ :** संचालक मंडळाने सादर केलेले वैधानिक लेखापरीक्षण श्री.व्ही.के. गुंजकर यांनी तपासलेले दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरचे ताळेबंद व नफा—तोटा पत्रक श्री. प्रकाश रा. सहारे, सचिव यांनी वाचन केले व सर्वानुमते स्विकृत करण्यांत आले.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ७ : सन २०२१—२०२२ चे मंजूर अंदाज पत्रकापेक्षा जास्त खर्चास नोंद घेणे व सन २०२२—२०२३ चे अंदाज पत्रकाची मंजुरी देणे.**

**ठराव क्र. ७ :** संस्थेने सन २०२१—२०२२ चे मंजूर अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या नफा विवरणपत्र श्री. प्रकाश रा. सहारे, सचिव यांनी वाचून दाखविण्यात आले सन २०२२—२०२३ चे अंदाज पत्रकाची मंजूरी देण्यात आली.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ८ : संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१—२०२२ वर्षाच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

ठराव क्र. ८ : अहवाल पुस्तिकेतील पृष्ठ क्र. ६ वर नमूद केल्याप्रमाणे सन २०२१—२०२२ या अहवाल वर्षात एकूण निव्वळ नफा रु. ५०,३०,६७१/— झाला असून नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्यांत आली.

| | |
|---|---|
| राखीव निधी २५% प्रमाणे | रु.१२,५७,६६८/— |
| लाभांश निधी ८% प्रमाणे | रु. ३५,३७,७५०/— |
| सभासद कल्याण निधी | रु.१,८५,२५३/— |
| एन.पी.ए.तरतूद | रु. ५०,०००/— |
| एकूण | रु. ५०,३०,६७१/— |

संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे निव्वळ नफ्याचे विनियोजन करण्यांत येवून सभेमध्ये श्री. प्रकाश रा. सहारे, सचिव यांनी वाचून दाखविली व नफा विनियोजनास व लाभांश वाटपास मंजुरी देण्यात यावी, असे सभेत सांगण्यात आले. त्यावर सभासदांनी चर्चा केली सभागृहाने चर्चे अंती लाभांश ७.५०% ऐवजी ७.७५% लाभांश देण्यात यावा, असे सभासदांचे ठाम मत असल्याने, सभागृहात लाभांश ०.२५% वाढविण्याकरिता लाभांश समिकरण निधी मधून रु. १,१७,९२५/— वळती करुन ७.७५% लाभांश देण्यात यावा, असे सर्वानुमते ठरविण्यात आंले. त्यावर वाटपास मंजुरी प्रदान केली.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. ९ : सन २०२१—२०२२ करिता वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे.**

ठराव क्र. ९ : सन २०२१—२०२२ करिता वैधानिक लेखापरीक्षण करण्याकरिता सहकार खात्याच्या पॅनल वरील प्रमाणित लेखापरीक्षक श्री. विनोद उ. दिवे यांची नियुक्ती करून त्यांच्याकडून लेखापरीक्षण करण्यांत यावे, असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र. १० : मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

ठराव क्र. ११ : मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेत असे ठरविण्यात आले की, सन्माननीय सभासद डॉ. सुनिल पाठीक यांनी पतपुरवठा संस्थेचे सभासद संख्या दरवर्षी कमी होत असल्याचे सांगितले. सभासद संख्या कमी होण्याचे कारण अनेक कर्मचारी व अधिकारी दरवर्षी मोठ्या संख्येत सेवानिवृत्त होत आहे. तसेच शासनाकडून नविन पदभरती वर निर्बंध असल्यामुळे, राज्यशासन सेवेतील कार्यरत अधिकारी व

कर्मचारी दिवसेंदिवस कमी होत आहेत. त्यामुळे पत संस्थेचे सभासद सुध्दा कमी होत आहेत. सन २०१६ मध्ये पतसंस्थेचे एकूण सभासद ५८७ इतकी होती, सन २०२२ मध्ये एकूण सभासद ३९७ इतके सभासद आहेत. यावर पतसंस्थेची कार्यकारणी मंडळ सभासद संख्या वाढविण्याकरिता प्रयत्न करतांना दिसून येत नाही. असेच होत राहिल्यास पतसंस्थेचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सभासद संख्या वाढविण्याकरिता जिल्हा परिषद सेवेतील पशुसंवर्धन खात्यातील पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना सभासद करून घ्यावी अशी मागणी डॉ. सुनिल पाठक यांनी केली. सध्या जिल्हा परिषद सेवेतील पशुधन विकास अधिकारी पतसंस्थेचे सभासद आहेतच, त्यामुळे पतसंस्थेच्या हिताच्या दृष्टिने सभासदाची संख्या वाढविण्याकरिता पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना सुध्दा सभासद केल्यास पतसंस्थेचे कोणतेही नुकसान होणार नाही. असे डॉ. पी.यु. चव्हाण व इतर मा. सभासदांनी मत व्यक्त केले. असे करण्यास कोणत्याही सभासदांचा आक्षेप नाही. परंतु नव्याने होणाऱ्या सभासदांकडून भागभांडवल व कर्जाची वसुली करण्याची हमी त्यांचा आहरण व संवितरण अधिकारी यांनी घेतलेल्या त्यांना सभासद करुन घेणे योग्य राहील, असे मत डॉ. रेवतकर साहेब यांनी व्यक्त केले तथापी सहकारी खात्याकडे या बाबतीत प्रस्ताव सादर करावे. त्यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात यावी व जिल्हा परिषद सेवेतील पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांना सभासद करून घ्यावे असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

आमसभेत ठराव सर्वानुमते मंजुर

त्या अनुषंगाने मा. डॉ. बी.आर. रामटेके, पदसिध्द अध्यक्ष तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांनी संस्था प्रगतीवर समाधान व्यक्त करून संस्थेविषयी सभासदांची आपुलकीची भावना, संस्थेचा विस्तार, उलाढाल, संस्थेच्या योजना उत्तरोत्तर प्रगतीकडे होणारी वाटचाल याचे श्रेय सभासदांनाच जात असून आमसभा शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली तसेच संस्था भविष्यकालीन प्रगतीस शुभेच्छा देत आपले मनोगत समाप्त केले.

त्यानंतर सभा अध्यक्ष श्री. दिलीपसिंह रा. चव्हाण यांनी अहवाल वर्षात संस्थेच्या भरभराटीकरिता व वसुली करिता सहकार्य केले, त्याबद्दल सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी व लिपिक वर्गीय व वर्ग चारचे आभार व्यक्त केले व भविष्यातही संस्थेला सहकार्य करतील अशी आशा ठेवून संस्थेनी केलेल्या प्रगती बाबत संस्थेच्या योजना, संस्थेचे रुपांतर बँकेत करण्यास आवश्यक ती कार्यवाही करण्याचे प्रयत्न करणे, वर्षाअखेर सर्व सभासदांना जमा–बाकी पावती दिली जाते, संस्थेचे व्यवहार पारदर्शक असल्याने संस्था प्रगतीवर असणे, आमसभा शांततेत पार पाडणे, ऑडीट वर्ग 'अ' मिळणे हे

शक्य झाले असल्याचे सांगून संस्थेच्या वसुली बाबत सर्व आहरण व संवितरण अधिकारी व प्रतिनिधी यांचे आभार मानून थकीत सभासद यांचेकडील वसुली त्वरित होण्याकरिता संबंधित अधिकारी व स्वत: सभासद यांनी प्रयत्न करावेत असे आव्हान केले व सभासदांना शुभेच्छा देवून आपले अध्यक्षीय मनोगत पूर्ण केले. प्रमुख अतिथी व सभा अध्यक्ष यांचे मनोगत समाप्ती नंतर श्री.पी.दि. खेडकर, यांनी सभेस उपस्थित प्रमुख अतिथी, सभा अध्यक्ष, संचालक मंडळ व सभासद या सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे घोषित केले.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कोषाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|---|
| **श्री. शशांक शं. चोबिटकर** | **श्रीमती ज्योती अ. घोडेस्वार** | **श्री. विजय अ. गजबे** | **श्री. प्रकाश रा. सहारे** |

# जीवनात खुप करण्याजोग असते.

संकटाला कधी कंटाळाच नसतं।
त्याला समोर जायच असतं।।

कोणी नांव ठेवली तरी थांबायचं नसतं।
आपलं चांगल काम करायचं असतं।।

अपयशाने कधी खचायचं नसतं।
जिद्दीचं बळ वाढवायचं असतं।।

नाराज मुळीच व्हायचं नसतं।
चैतन्य सदा फुलवायचं असतं।।

पाय ओढले म्हणून परतायचं नसतं।
पुढे अन् पुढेचं जायचं असतं।।

लोकनिंदेला घाबरायचं नसतं।
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं।।

जीवनात खुप करण्याजोग असतं।
आपलं फक्त तिकडे लक्ष नसतं।।

---

**पशुसंवर्धन विभागात कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शेतकरी गोरगरिबाकडील पशुधनाची सेवा करून आपल्या सहकारी क्षेत्रात योग्य दिशेने वाटचाल करण्याकरिता व विकासाचे धोरणातील मुख्य प्रवाहात राहुन राष्ट्रहित जोपासण्याचे दृष्टीने सर्व खात्यातील बांधवांना एकत्र करून पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्था जुलै १९७२ साली सुरू करण्यात आली. त्याचे ऋणी आहोत.**

**आपले बांधवाचे राष्ट्रीय संपत्ती उत्पन्नात पशुधन पदार्थ, मांस उत्पादन, अंडी उत्पादन, लोकर उत्पादन व जनतेच्या दैनंदिनी आवश्यक गरजा भागविण्याकरिता आपण तत्परतेने कार्य करीत आहोत.**

**त्याकरीता सर्व सन्माननीय सभासदांचे हार्दिक अभिनंदन !**

**अध्यक्ष**
**पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी**
**पतपुरवठा संस्था मर्यादित, नागपूर.**

पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, परिसर, महाराजबाग समोर, नागपूर - १२
नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२
Email - ahsociety.nagpur@gmail.com Website - ahsocietyngp.com Phone No. 0712-2524868

## संस्थेतर्फे सभासदांचे गुणवत्ता प्राप्त मुला मुलींचा सत्कार
## सभासदांनी करावयाचा अर्ज

संस्थेच्या नियमान्वये इयत्ता चौथी, सातवी, दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासदाचे मुला–मुलींचा संस्थेच्या वार्षिक आमसभेत प्रोत्साहनपर बक्षीस देऊन सत्कार करण्यात येतो. करिता ज्या सभासदाचे पाल्य उपरोक्त परीक्षेत उत्तीर्ण झालेले असतील त्यांनी खाली दर्शविलेला अर्ज भरुन संस्थेकडे आमसभेपूर्वी १५ अगोदर जमा करावा हि विनंती.

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव
पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पतपुरवठा
संस्था मर्यादित, नागपूर

महोदय,

माझा मुलगा / मुलगी इयत्ता ४ थी, ७ वी, १० वी, १२ वी च्या परीक्षेत .................. गुण टक्के घेऊन प्रथम / प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झालेला आहे. करिता आपले माहितीस सादर.

१. सभासदाचे नाव : श्री / श्रीमती / डॉ. ____________________

२. कार्यालय व पत्ता : ____________________

३. मुलाचे / मुलीचे नाव : ____________________

४. शाळेचे नाव : ____________________

५. उत्तीर्ण केलेली परीक्षा : ____________________

६. उत्तीर्ण केल्याचे वर्ष : ____________ माध्यम ____________

एकुण गुण ____________ प्राप्त गुण ____________ टक्केवारी ____________

७. संपर्क पत्ता : ____________________

दूरध्वनी / मो. नंबर ____________________

सहपत्र :—

१. गुणपत्रिकेची सत्यप्रत

आपला सभासद

स्वाक्षरी ..................................

श्री / श्रीमती / डॉ. ..................................

टिप : सभासदांनी पाल्यास सोबत आणणे अनिवार्य आहे. पाल्य हजर असल्यावरच बक्षिस वितरण केले जाईल. कृपया याची नोंद घ्यावी.

# पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित, नागपूर

महाराजबाग समोर, नागपूर

नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२











जावक क्र. : ३०१
दिनांक : ११-०८-२०२३

**Book Post**

श्री/श्रीमती/डॉ. ______________________

______________________

______________________

**प्रेषक :**

**पशुसंवर्धन कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्था मर्यादित, नागपूर.**

पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, परिसर, महाराजबाग समोर, नागपूर - १२

नोंदणी क्र. एन.जी.पी./बी.एन.के./२०१ दिनांक ३१/०७/१९७२

दुरध्वनी क्र. : ०७१२ - २५२४८६८ • E-mail : ahsociety.nagpur@gmail.com

Website : www.ahsocietyngp.com

सचिव
श्री. प्रकाश रा. सहारे

ShriNiketan 9823067650